# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/मान्यता/२००६/४५०

दिनांक : - 9 ऑगस्ट AUG 2006

प्रति,
प्राचार्य,
यंग इंजिनिअर्स एज्युकेशन सोसायटीचे,
महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,
(बेटाडा), ब्रम्हपुरी,
जि. चंद्रपूर

**विषय :-शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ :-१) शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६, दिनांक २४.०५.२००६.

२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक : १०/एनजीपी/औनिशा पदविका/मान्यता/२००६/१४०, दिनांक ३०.०५.२००६.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००६-२००७ साठी खालील पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहीत अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

या संचालनालयाच्या संदर्भाधिन क्रमांक-२ च्या पत्रान्वये दिलेल्या परवानगीस अनुसरुन वरील पदविका संस्थेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची नियत ठेव म्हणून सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर व अध्यक्ष, यंग इंजिनिअर्स एज्युकेशन सोसायटी, कुरखेडा, जि. गडचिरोली यांच्या संयुक्त खात्यात रुपये २०.०० लाख स्टेट बँक ऑफ इंडिया, कुरखेडा येथे पावती क्रमांक : ५५६५४०, दिनांक ३.८.२००६, अन्वये १० वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अध्यक्ष, यंग इंजिनिअर्स एज्युकेशन सोसायटी, कुरखेडा, जि. गडचिरोली यांच्या संयुक्त खात्यात रुपये ५.०० लाख स्टेट बँक ऑफ इंडिया, कुरखेडा येथे पावती क्रमांक : ५५६५३९, दिनांक ३.८.२००६, अन्वये ५ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी रुपये ५.०० लाख, इतक्या रकमेची ५ वर्षासाठी नियतठेव संदर्भाधिन क्रमांक-२ मध्ये नमूद केल्यानुसार भरण्यात यावी. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

(1)

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम ३३८२/१११८३६/(१९०)तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

७. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

८. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

९. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१०. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

११. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

**( प्रा. न. बा. पासलकर )**
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन पत्राचे संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर.
५. श्री.एन.बी.पाटील सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. कार्यासन क्र.२-अ यांना माहितीसाठी.
७. निवड नस्ती.